| **Publication** – Prabhat | **Page No** - 09 |
|---|---|

# इंडिया रबर एक्स्पोचे आयोजन

**पुणे –** इंडिया रबर एक्स्पो(आयआरइ) हा आशियाचा सर्वात मोठा रबर एक्सपो आहे. आता १० वे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषद मुंबईत बाँबे एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित केली जाणार असून ते विकास, आदानप्रदान आणि सहयोगासाठी उत्तम मंच ठरणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशन या १९४५ मध्ये स्थापना झालेल्या देशातील सर्वात जुन्या प्रिमियर इंडस्ट्रिज असोसिएशनमार्फत होणार आहे. आयआरइ २०१९ चे अध्यक्ष एम डी विक्रम मकार म्हणाले, यामुळे रबर व्यवसायिकांना नेटवर्क तयार करण्याची संधी मिळेल.